# मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई.

संदर्भ : माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र. बी (जन) ५६०१/५७/२०२०/ २९ दिनांक ०७.०१.२०२०.

## कार्यालयीन आदेश

(क्र.आस्था१६/ ८१ /२०२० दिनांक १६.०१.२०२०)

माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या वरील संदर्भांकित पत्रातील आदेशान्वये, मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई हे या कार्यालयातील **'लघुलेखक (निम्न श्रेणी)'** या पदाच्या रिक्त पदासाठी श्री. निलेश चंद्रकांत गांगुर्डे, लिपिक-टंकलेखक, यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत. उपरोक्त उमेदवाराची वेतननिश्चिती सातव्या आयोगाच्या शिफारसीनुसार **रु. ३८,६०० - १,२२,८०० (एस-१४),** या वेतनश्रेणीमध्ये करण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा करण्यात येईल.

सदर उमेदवाराने या कार्यालयात **दिनांक २२.०१.२०२०** (मध्यान्हपूर्व) रोजी हजर रहावे.

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव व क्रमांक | उमेदवारास परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | श्री. निलेश चंद्रकांत गांगुर्डे (DCR55171) | इंग्रजी भाषेतील श्रुतलेखन परीक्षा ("E") | २३-४/७, रमाबाई आंबेडकर नगर, जय संतोषी माता फ्लोअर मिलच्या बाजुला, (नम्रता चाळ), जलप्रभात नगर, घाटकोपर (पुर्व), मुंबई ४०००७५. |

१) उपरोक्त उमेदवाराची नेमणूक ही अस्थायी स्वरुपाची असेल.

२) उपरोक्त उमेदवाराने कामावर रूजू होतांना मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती, सदर परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) व पॅन कार्ड/आधार कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स (यापैकी एक) सादर करावे.

..०२..

३) उमेदवारास कामावर रुजू झाल्यानंतर सदर कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल.

४) उमेदवाराने एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

५) अ) उपरोक्त उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन नियमावलीनुसार परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ नुसार मराठी लघुलेखनाची व मराठी टंकलेखनाची एतदर्थ मंडळाची परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

ब) शासन निर्णय क्रमांकः टंलेप-२०१५/प्र.क्र.१७६/भाषा-२, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक २४ मार्च, २०१७ अन्वये, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २४ मार्च, २०१७ च्या अधिसूचनेनुसार, ज्या उमेदवारांनी त्यांच्या मूळ नियुक्तीच्या वेळी किंवा यथास्थिती, शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या कालावधीत मराठी लघुलेखनाचे ८० शब्द प्रति मिनिट गतीचे व मराठी टंकलेखनाचे ३० शब्द प्रति मिनिट गतीचे अथवा अधिक गतीचे मराठी लघुलेखन व मराठी टंकलेखनाचे **"शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र"** धारण केले आहे अशा उमेदवारांना एतदर्थ मंडळाची ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखनाची व ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

६) उपरोक्त उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५, अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७.०७.२००७ आणि अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/ सेवा-४ दिनांक ०६.०४.२०१५ व त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नवीन 'परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना-D.C.P.S.(राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना -NPS)' लागू राहील.

७) माननीय उच्च न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशानुसार उमेदवारास आंतरजिल्हा बदली अर्ज, या कार्यालयात दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही.

८) उमेदवाराची सेवा निवड/प्रतिक्षा यादीनुसार त्यांची सेवा ज्येष्ठता राहील, परंतु उमेदवार विहीत वेळेत सेवेत रुजू न झाल्यास त्याचा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर परिणाम होईल.

९) उपरोक्त उमेदवारास सूचित करण्यात येते की, त्यांनी दिलेली माहिती आणि जोडलेली शैक्षणिक व इतर प्रमाणपत्र चुकीची आढळल्यास त्यांना त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल.

१०) उपरोक्त उमेदवाराची सेवा ही महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियमाधीन असेल.

११) उपरोक्त उमेदवारास असे कळविण्यात येते की, त्यांनी **कार्यालयीन अधीक्षक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, आस्थापना विभाग, तिसरा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे वरील नमुद तारखेस सकाळी ठिक १०.३० वाजता न चुकता हजर रहावे किंवा उमेदवाराने त्यांना हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत हजर न झाल्यास सदर उमेदवाराचे नांव कमी करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

१२) श्री. निलेश चंद्रकांत गांगुर्डे यांच्या नावांपुढे ("E") असे लिहिलेले असल्याने, त्यांनी या आस्थापनेवर नियुक्ती झाल्यापासून एक वर्षाचे आत कार्यालयाद्वारे घेण्यात येणारी इंग्रजी भाषेतील श्रुतलेखन परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी एक वर्षाचे आत सदरील परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास, त्यांची नियुक्ती रद्दबादल ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१३) सदरील उमेदवाराची नियुक्ती ही एक वर्षाचे कालावधीसाठी तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरूपाची राहील.

१४) उपरोक्त उमेदवारांस प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

15.1.20

**(माधव अ. शिंदे)**
मुख्य महानगर दंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

माननीय प्रबंधक (निरिक्षण -१), उच्च न्यायालय, मुंबई यांना माहितीकरिता प्रत रवाना.

प्रत माहितीकरिता :

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२. प्रबंधक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई.
३. उपप्रबंधक/कार्यालयीन अधीक्षक, एस्प्लनेड, मुंबई.
४. मुख्य लिपिक, एस्प्लनेड, मुंबई.
५. गोपनीय विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
६. वेतन आणि रजा व सेवापुस्तक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
७. भविष्य निर्वाह निधी/निवृत्ती वेतन विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
८. सेवार्थ विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
९. रोख विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
१०. संगणक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
११. कार्यालयीन आदेश फाईल, एस्प्लनेड, मुंबई.
१२. संबंधित उमेदवार.